सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.
श्रीम. मनिषा पराग सावंत, लेखा अधिकारी.

**महाराष्ट्र शासन**

वित्त विभाग,

शासन आदेश:-संलेको-२०२६/प्र.क्र.९३/१६७२१६२/कोषा प्रशा -२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- १८ जून, २०२६.

<u>संदर्भ</u>:- १) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको /प्रशा-राप/का-६/श्रीम. म.पं.सावंत/ ४.२६/५०८/४०८/१८३७, दि.०२.०४.२०२६

२) श्रीम. मनिषा पराग सावंत, दि.१२.१२.२०२५ व दि. २०.०३.२०२६ रोजीचे अर्ज

३) कार्यासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग (मंआस्था १), मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र. मुमंस - १०२५/ प्र. क्र. १ (भाग- २४) मंआस्था -१, दि.१२.१२.२०२५

४) संचालनालयाचे आदेश क्र. संलेको / रोख / कार्या १/ श्रीम. मनिषा सावंत / प्रतिक्षाधीन /१२.२०२५ /७६६, दि.१२.१२.२०२५

५) संचालनालयाचे आदेश क्र. संलेको / रोख / कार्या- १ / श्रीम. मनिषा सावंत / प्रतिक्षाधीन / १२-२०२५ /७७६, दि.१८.१२.२०२५

६) वित्त विभाग, शासन आदेश क्र. संलेको २०२६ / प्र. क्र. १४ / कोषा प्रशा २, दि.१८.३.२०२६

७) संचालनालयाचे आदेश क्र. संलेको / रोख / कार्या- १ / श्रीम. मपसावंत / प्रतिक्षाधीन / ०३.२०२६ / १६०, दि.१८.३.२०२६

८) पु. ल. देशपांडे कला अकादमी, मुंबई यांचे आदेश क्र. पुलदे / जा. क्र. ३७७, दि.२०.३.२०२६

९) संचालनालयाचे आदेश क्र. संलेवको / प्रशा-राप / का. क्र. ६/रजा /म.प.सावंत / ४.२६/५०७, दि.०२.०४.२०२६

१०) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. सेनिवे १००१ / १३० / सेवा-४, दि.२.६.२००३

## -: <u>शासन आदेश</u> :-

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील श्रीम. मनिषा पराग सावंत यांना संदर्भ क्र.२ येथील आदेशान्वये मुख्यमंत्री सचिवालयातून दि.११.१२.२०२५ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले.

२. श्रीम. सावंत यांनी दि.१२.१२.२०२५ रोजीच्या अर्जान्वये पदस्थापनेच्या प्रतिक्षेत संचालनालयात दि.१२.१२.२०२५ (म.पू.) रोजी हजर करुन घेण्यास विनंती केली.

३. संचालनालयाचे संदर्भ क्र.४ येथील दि.१२.१२.२०२५ रोजीचे आदेशान्वये श्रीम. सावंत, यांना प्रतिक्षाधीन अधिकारी म्हणून संचालनालयात दि.१२.१२.२०२५ (म.पू.) रोजी रुजू करुन घेण्यात आले व त्यांची सेवा उपयोगात आणण्याकरिता त्यांना गोपनीय अहवाल कक्ष शाखेत तात्पुरती पदस्थापना देण्यात आली. तसेच संदर्भ क्र. ५ येथील दि. १८.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये त्यांची प्रतिक्षाधीन अधिकारी म्हणून त्यांची निवृत्तीवेतन शाखेत तात्पुरती पदस्थापना देण्यात आली.

४. शासन वित्त विभागाचे संदर्भ क्र. ६ येथील दि.१८.०३.२०२६ रोजीचे आदेशान्वये पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असलेल्या श्रीम. सावंत यांना लेखा अधिकारी, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई या पदावर पदस्थाना देण्यात आली. त्यानुसार संचालनालयाचे दि.१८.०३.२०२६ रोजीचे आदेशान्वये सदर पदावर हजर होण्यासाठी श्रीम. सावंत यांना दि.१८.०३.२०२६ (म.नं.) रोजी संचालनालयातून कार्यमुक्त करण्यात आले. त्यानुसार श्रीम. सावंत, यांच्या दि.२०.०३.२०२६ रोजीच्या अर्जान्वये त्या लेखा अधिकारी, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई या पदावर दि.२०.०३.२०२६ (म.पू) रोजी रुजू झाल्या.

५. पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई यांचे दिनांक २०.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये श्रीम. सावंत यांना दि.२०.०३.२०२६ (म.पू.) रोजी रूजू करून घेण्यात आल्याबाबत संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

६. श्रीम. सावंत, यांना दि. १२.१२.२०२५ ते १९.०३.२०२६ पर्यंत म्हणजेच एकूण ९८ दिवस नियमित पदनियुक्तीचे आदेश मिळेपर्यंत पदस्थापनेशिवाय रहावे लागले आहे. नियमित करावयाच्या कालावधीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|
| दि.१२.१२.२०२५ ते १५.१२.२०२५ | ४ दिवस | संचालनालयातील गोपनीय अहवाल अहवाल कक्ष शाखेत कार्यरत |
| दि. १६.१२.२०२५ ते १८.१२.२०२५ | ३ दिवस | परिवर्तित रजा |
| दि.१९.१२.२०२५ ते १८.०३.२०२६ | ९० दिवस | संचालनालयातील निवृत्तीवेतन शाखेत कार्यरत |
| दि.१९.०३.२०२६ | १ दिवस | गुढी पाडव्याची सार्वजनिक सूटी |
| एकूण | ९८ दिवस | |

७. श्रीम. सावंत यांना मुख्यमंत्री सचिवालयातून कार्यमुक्त केल्यानंतर त्या तात्काळ संचालनालयात उपस्थित झाल्या होत्या व त्यांच्या सेवा उपयोगात आणल्या आहेत. त्यामुळे वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.२०.०२.२००८ मधील तरतूदीनुसार श्रीम. सावंत यांना प्रतिक्षाधीन कालावधी अनुज्ञेय होतो.

८. शासन परिपत्रक दिनांक २०.०२.२००८ मधील सूचना तसेच, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील नियम क्र. ९ (१४) (फ) व ९ (१४) (जी) मधील तरतूदी विचारात घेता, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील श्रीम. मनिषा पराग सावंत यांचा दिनांक १२.१२.२०२५ ते दिनांक १९.०३.२०२६ पर्यंत एकूण ९८ दिवसांचा सक्तीचा प्रतिक्षेचा कालावधी हा "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.

तसेच, सदर कालावधीतील वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता संचालनालयाने प्रस्तावित केल्याप्रमाणे लेखा अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

(ता.र.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :-

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
५) आंहरण व संवितरण अधिकारी तथा लेखा अधिकारी, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई ,*
६) श्रीम. मनिषा पराग सावंत, लेखाधिकारी *
७) संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख,*
८) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,

*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)